क्वॉण्टमचा क्यूएचएम ७४८७-२व्ही यूएसबी गेम पॅड

क्वॉण्टम हायटेकने क्यूएचएम ७४८७-२व्ही यूएसबी गेम पॅड बाजारात आणले आहे. हा गेम पॅड अविरत गेमिंगकरिता शक्तिशाली डय्अल व्हायब्रेशन फीडबॅकसह संयोजित प्रगत ड्युएल व्हायब्रेट फंक्शन्स व आरामदायी नियंत्रणासाठी उत्कृष्टरीत्या डिझाइन करण्यात आला आहे. आता तुम्ही खेळत असलेल्या प्रत्येक गेममधील प्रत्येक हिट, क्रॅश व एक्सप्लोजनसह रील अॅक्शनचा आनंद घेऊ शकणार आहे. ४७५ रुपये किंमत असलेला क्यूएचएम ७४८७-२व्ही यूएसबी पारंपरिक डिझाइनसह नियंत्रण अनुभवासारख्या एका कन्सोलकरिता रचण्यात आला आहे. गेमपॅड एका हातमोज्याप्रमाणे फिट बसणारा आहे. हातांच्या बोटांमध्ये परिपूर्णपणे फिट बसतील, अशा ८ ठिकाणी मार्गदर्शक बटनांसह संयोजित आणि टर्बोचे एलईडी इंडिकेटर व ऑटो मोड बटनांसह समर्थित, गेमपॅड अॅक्शन किंवा शूटिंग गेम्सकरिता परिपूर्ण असा आहे. अॅक्शन गेम्समधील उत्तम नियंत्रणाकरिता, डिव्हाईस २-३डी जॉयस्टिक बटनांसहसुद्धा संयोजित आहे. अतिरिक्त गेमिंग लाभांकरिता, वा डिव्हाईसमध्ये फायर बटन्स व स्लो बटन्स समाविष्ट आहेत आणि हे डिव्हाईस वैयक्तिक नियंत्रणांसह संयोजित आहे, जे विविध पर्यायांकरिता एकाच बटनवर क्लिक करण्याऐवजी इतर कोणतेही पर्याय निवडताना तुम्हाला सहजता प्रदान करतात. लाल, निळा, पिवळ्य व सफेद अशा रंगांमध्ये उपलब्ध असलेला, क्यूएचएम ७४८७ हा सौम्य कडा व मजबूत रबर ग्रिपसह उत्तमरीत्या डिझाइन करण्यात आला आहे, ज्यामुळे हा डिव्हाईस दीर्घकालीन प्लेइंग सत्रांकरिता हातामध्ये सहजपणे व आरामशीरपणे फिट बसतो. गेमिंग पॅड २०००/ विंडोज एक्सपी, विंडोज व्हिस्टा किंवा विंडोज ७ किंवा विंडोज ८ सह संयोजित आहे आणि हा डिव्हाईस १ वर्षाच्या वॉरंटीसह प्रमुख ई-कॉमर्स पोर्टल्स व रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध आहे.